दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १२३ वा शनिवार दि.१९ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## पंतप्रधानांनीच भ्रष्टचाऱ्यांना सत्तेत बसवले, सहकारमहर्षी दिलीपराव देशमुखांची टीका

लातूर/ प्रतिनिधी : – सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी आपल्या सर्वांना मिळून काम करायचे आहे. कोरोना काळात महाविकास आघाडी सरकारने आरोग्य सेवेचे उत्तम काम केले आहे. सरकारच्या निधीचा सर्वसामान्य माणसाला फायदा झाला पाहिजे. परंतु, या सरकारने निकृष्ट दर्जाची कामे करून कंत्राटदारांचा फायदा केला आहे, असा आरोप लातूर ग्रामीण मतदारसंघाचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केला. लातूर जिल्हा काँग्रेसचा होता, आहे व राहणारच असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. लातूर ग्रामीण मतदारसंघांतर्गत आलमला, भादा, उजनी व आशीव या जिल्हा परिषद सर्कलमधील विविध गावांतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहकारमहर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी आमदार वैजनाथ शिंदे, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष श्याम भोसले, लक्ष्मण मोरे, पृथ्वीराज शिरसाठ, नारायण लोखंडे, संतोष देशमुख, संभाजी सूळ, सचिन पाटील, जनार्दन वंगवाड, चाँदपाशा इनामदार, प्रवीण पाटील, गणपतराव बाजुगळे, महेंद्र भादेकर, बालाजी पांढरे, सदाशिव कदम, रघुनाथ शिंदे, राजकुमार पाटील, हरिराम कुलकर्णी, रामदास पवार, धनंजय देशमुख, स्वयंप्रभा पाटील, शेरखान पठाण, शिवाजी कांबळे, सचिन दाताळ, अनुप शेळके, प्रमोद जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.




आजच्याच दिवशी साहेबांनी घेतली होती मुख्यमंत्रिपदाची शपथ आज दि. १८ ऑक्टोबर हा दिवस एक ऐतिहासिक दिवस आहे. २५ वर्षांपूर्वी १८ ऑक्टोबर या दिवशी लोकनेते विलासराव देशमुख साहेबांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. लोकनेत्यांचे काम कसे असावे हे साहेबांकडून शिकले पाहिजे. स्वतःचा विचार न करता त्यांनी माणसे जोडली, संस्था मोठ्या केल्या असे आमदार धिरज देशमुख यांनी म्हटले. आपल्या ३० गावांमध्ये रस्ते, वीजपुरवठा, सबस्टेशन यासाठी आम्ही काम केले आहे. तावरजा बॅरेजेसचे गेटच्या जागेचे काम केल्यामुळे वाहून जाणारे पाणी त्या ठिकाणी थांबलेले आहे. जे प्रलंबित प्रश्न आहेत तेही सोडवले जातील. येणाऱ्या काळामध्ये बेरोजगारांसाठी, शेतकऱ्यांसाठी, सर्वसामान्य माणसांसाठी काम करावयाचे आहे. शेती, निविदावर जीएसटी नसली पाहिजे यासाठी आमचा प्रयत्न असेल, असे त्यांनी सांगितले. म्हणून महाविकास आघाडीला मतदान करा... पीक विमा कंपनी शेतकऱ्यांची दरवर्षी फसवणूक करते आहे. शेतकऱ्याला विमा कंपनीच्या दारामध्ये उभा राहण्याची गरज पडायला नको. यासाठी विमा कंपनी सरकारची असावी अशी आमची भूमिका येणाऱ्या काळात असेल असे सांगितले. लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक, साखर कारखाने यांनी शेतकऱ्याला सहकार्य केले आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेला आहे. कायद्याचा धाक कमी झाला आहे. तो धाक निर्माण करण्यासाठी महाविकास आघाडीला मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यकर्त्यांनी गावागावात, घराघरात जाऊन काँग्रेसचा विचार पेरला पाहिजे. १८ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबर हा प्रचाराचा काळ आहे. या काळात आपण सर्वांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त करून लातूर जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता आहे व राहणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विधानसभा निवडणूक विचारांची– सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख विधानसभेची निवडणूक एक विचाराची निवडणूक आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाची पेरणी या निवडणुकीत होणार आहे. कोणत्या विचाराचे सरकार असावे हे आपण ठरवण्याची गरज आहे. पेरणीचे दिवस आहेत. त्यासाठी चांगल्या बियाणांची पेरणी करण्याची आवश्यकता आहे, असे वक्तव्य सहकारमहर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले. शाहू महाराजांनी देशांमध्ये पहिले आरक्षण दिले होते. दलित माणसाला राजवाड्यासमोर हॉटेल टाकून दिले व रयतेचा विचार केला. जगातील सर्वात चांगले संविधान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केले आहे आणि हे संविधान चुकीच्या माणसाच्या हाती गेल्यावर देशाचे नुकसान झाल्याशिवाय राहत नाही, असेही ते म्हणाले. भ्रष्ट लोकांना सोडणार नाही असे म्हणणारे देशाचे पंतप्रधानांनी याच लोकांना सत्तेत बसवल्याचा आरोप त्यांनी केला. आदरणीय यशवंतराव चव्हाण, बॅरिस्टर अंतुले, विलासराव देशमुख यांची परंपरा पुढे नेण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला विजय करण्याचे आव्हान त्यांनी या प्रसंगी केले.

## रासप तुल्यबळ उमेदवार देणार – प्रा.विष्णू गोरे

लातूर/प्रतिनिधी: राष्ट्रीय समाज पक्ष आगामी विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढणार असून मराठवाड्यातील सर्व जागांवर पक्षाकडून तुल्यबळ उमेदवार दिले जाणार आहेत. इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या असून उमेदवारांची पहिली यादी जाहीर झाली असल्याची माहिती रासपचे मराठवाडा अध्यक्ष प्रा. विष्णू गोरे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

पत्रकारांशी वार्तालाप करताना प्रा.गोरे म्हणाले की,राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी विधानसभा निवडणुका स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली आहे. कुठल्याही युती किंवा आघाडीत सहभागी न होता सर्व २८८ जागांवर पक्षाकडून उमेदवार उभे केले जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. प्रा.गोरे यांनी सांगितले की,




मराठवाड्यातील ४६ जागांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या आहेत. त्यापैकी ८ ठिकाणचे उमेदवार जाहीर झाले आहेत.यात निलंगा मतदारसंघासाठी नागनाथ बोडके यांच्या नावाचा समावेश आहे.आगामी कांही दिवसात उमेदवारांची दुसरी यादी पक्षाध्यक्ष जाहीर करणार आहेत.


ते म्हणाले की,उमेदवारी देताना पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्याला प्राधान्य दिले जाणार आहे.पहिल्या यादीवरूनच हे स्पष्ट होते. इतर पक्षातील अनेक तुल्यबळ इच्छुक उमेदवार संपर्कात आहेत.माजी मंत्री,माजी आमदार तसेच सामाजिक क्षेत्रातील वजनदार व्यक्तिमत्त्वांनी उमेदवारीची मागणी केलेली आहे.दि.२२ रोजी उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होणार असून तत्पूर्वीच उमेदवारांची यादी जाहीर होईल. बहुतांश उमेदवार पहिल्याच दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस पक्षाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष नागनाथ बोडके शहर जिल्हाध्यक्ष दादासाहेब करपे,यांची उपस्थिती होती.

## केज मध्ये काँग्रेसकडून रवींद्र दळवी यांची उमेदवारी घोषित होण्याची शक्यता

### बीड जिल्ह्यात एकमेव जागा काँग्रेस लढविणार !

केज/ प्रतिनिधी :– गेल्या दोन दशकांपासून सक्रिय राजकारणात असलेले परंतु सत्तेपासून अद्यापही दुर्लक्षित असलेले काँग्रेसचे नेते तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस रवींद्र दळवी यांची केज विधानसभेसाठी काँग्रेसकडून उमेदवारी येण्याची दाट शक्यता वर्तवली जात असून येत्या दोन दिवसात काँग्रेस पक्षाकडून ही उमेदवारी अधिकृतपणे जाहीर होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. केज विधानसभा राखीव मतदारसंघ हा वाटाघाटी मध्ये काँग्रेसकडे राहण्याची शक्यता वर्तवली जात असून जर असे झाले तर केज विधानसभा हा एकमेव मतदारसंघ काँग्रेसच्या वाट्याला येणार आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात एकमेव केजची जागा काँग्रेस कडे राहण्याची शक्यता आहे.या जागेसाठी काँग्रेसचे प्रदेश महासचिव रवींद्र दळवी यांनी दावा केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रवींद्र दळवी हे सक्रिय राजकारणात आहेत. काँग्रेस मध्ये एकनिष्ठ असलेले रवींद्र दळवी यांनी महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाची मोठी जबाबदारी पार पाडलेली असून त्यांनी अनेक पदावर अतिशय उत्कृष्ट रित्या काम केलेले आहे. त्यामुळे काँग्रेसने त्यांना पंजाब, हरियाणा, तेलंगणा, ओरिसा राज्याचे प्रभारी म्हणून देखील जबाबदारी सांभाळली आहे. सध्या पंजाब राज्याचे प्रभारी म्हणून काम पाहत आहेत.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस पदाची धुरा देखील काँग्रेसने त्यांच्या खांद्यावर सोपवलेली आहे.रवींद्र दळवी हे बीड येथील रहिवासी असून सध्या त्यांनी आजपर्यंत भूषविलेले पदे बीड येथील गणराज अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष,बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक,तसेच राज्याचे माजी संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ लि.महाराष्ट्र राज्य मुंबई, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी मागासवर्गीय विभागाचे राज्य



अध्यक्ष म्हणून देखील दळवी यांनी जबाबदारी पेलावली आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संभाजीनगर अधिसभा सदस्य,तसेच माजी अध्यक्ष–स्थायी समिती डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.माजी संचालक–महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ लि.मुंबई.माजी सदस्य–महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद,महाराष्ट्र शासन,माजी सदस्य– जिल्हा नियोजन व विकास समिती बीड,संचालक–जीवनदीप शिक्षण प्रसारक मंडळ महाराष्ट्र.व अध्यक्ष स्वप्नपूर्ती सेवाभावी संस्था ,बीड व सध्या महाराष्ट्र राज्याचे अ.भा.काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव अ.भा.कॉ.कमिटी प्रभारी पंजाब प्रदेश राष्ट्रीय समन्वयक–अ.भा.कॉग्रेस कमिटी. (प्रभारी – तेलंगणा,ओरिसा राज्य व महासचिव – महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटीचे महासचिव म्हणून कार्यरत आहेत.

## राज्य सरकारकडून १०३ निर्णय आणि ८ कंत्राट रद्द

मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतरही राज्य सरकारने अनेक निर्णय तसेच कंत्राट निविदा प्रसिद्ध करून केलेल्या आचारसंहिता भंगाची केंद्रीय निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली असून राज्य सरकारला वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्य सरकारने आचारसंहिता काळात सरकारच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेले १०३ शासन निर्णय मागे घेतले असून आठ कंत्राटही रद्द केली आहेत. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातून सरकारला पत्र पाठवून मंगळवारी दुपारी साडेतीननंतर आचारसंहिता लागणार असल्याने या काळात कोणतेही शासन निर्णय, नियुत्या, टेंडर प्रसिद्ध करू नका, असे आदेश दिले होते. राज्य सरकारने मात्र आयोगाच्या या आदेशाकडे दुर्लक्ष करीत मंगळवारी आणि बुधवारी अनेक निर्णय घेतले आहेत. निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी महायुती सरकारने मंत्रिमंडळ बैठकांचा सपाटा लावत समाजातील विविध घटकांसाठी अनेक लोकप्रिय निर्णय घेतले. हे निर्णय घेताना अनेक वेळा विहित प्रक्रिया पूर्ण न होताच निर्णय घेण्यात आले. त्यानंतर विभागांनी प्रस्ताव आणि शासन निर्णयांची प्रक्रिया सुरू केली. त्याचप्रमाणे सरकारने विविध महामंडळांवर पदाधिका–यांच्या नियुक्या केल्या. काही महामंडळावरील पदाधिका–यांच्या नियुक्तीचे शासन निर्णय १४ तारखेला काढण्यात आले. अनेक महामंडळांवरील पदाधिका–यांच्या नियुक्तीचे शासन आदेश निघालेले नाहीत. त्याचप्रमाणे अनेक पदाधिका–यांनी पदभार स्वीकारलेला नाही. सरकारने बुधवारी २७ महामंडळांच्या पदाधिका–यांच्या नियुक्त्या केल्या. मात्र आचारसंहिता लागू होईपर्यंत ज्यांनी पदभार स्वीकारलेला नाही त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढण्यास किंवा पदभार स्वीकारण्यास आयोगाने मज्जाव केला आहे. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका–यांनी याबाबत राज्य सरकारला पत्र पाठवून आचारसंहिता जाहीर झाली त्यावेळची परिस्थिती कायम राहील. शासन निर्णय निघाला असला आणि त्यांची अंमलबजावणी सुरू झाली नसेल तर अशा निर्णयांची अंमलबजावणी करता येणार नाही. तसेच मंत्रिमंळात निर्णय झाला असे सांगून आता शासन निर्णय काढणे किंवा त्याची अंमलबजावणी करणे हा आचारसंहिता भंग असून त्यास सबंधित विभागाचे सचिव जबाबदार असतील, असा इशारा दिला आहे. तसेच काही निर्णय किंवा वित्तीय बाबी संबंधित योजनांच्या अंमलबजावणीबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाची मान्यता घ्यावी लागेल असेही या



पत्रात नमूद करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी दुपारी साडेतीन वाजता पत्रकार परिषद घेऊन राज्यात निवडणुकीची घोषणा केली. याबाबतची आयोगाकडून सूचना आल्यानंतर राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातून सरकारला पत्र पाठवून दुपारी साडेतीननंतर आचारसंहिता लागणार असल्याने या काळात कोणतेही शासन निर्णय, नियुत्या, टेंडर प्रसिद्ध करू नका, असे आदेश दिले होते. राज्य सरकारने मात्र आयोगाच्या या आदेशाकडे दुर्लक्ष करीत मंगळवारी आणि बुधवारी तब्बल १०३ शासन निर्णय निर्गमित केले होते. बुधवारी ही गंभीर बाब आयोगाच्या निदर्शनास आल्यानंतर यासंदर्भात चौकशी करून आचारसंहितेचा भंग झाला असल्यास संबंधितांच्या विरोधात कारवाई करण्याचा इशारा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्लिंगम यांनी दिला होता. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारच्या कारभाराची गंभीर दखल घेत राज्याच्या मुख्य निवडणूक निर्णय अधिका–यांकडून अहवाल मागविल्याचे सांगण्यात आले.

## पीएम मोदी दोन दिवशीय रशिया दौ–यावर जाणार

नवी दिल्ली : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २२–२३ ऑक्टोबर रोजी रशिया दौ–यावर जाणार आहेत. या दौ–यात पंतप्रधान मोदी, रशियाच्या अध्यक्षतेखाली कझान येथे होणा–या १६ व्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होतील. समान जागतिक विकास आणि सुरक्षिततेसाठी बहुपक्षीयता मजबूत करणे या थीमवर यंदाची ब्रिक्स शिखर परिषद आयोजित केली आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या अध्यक्षतेखाली होणा–या या परिषदेत ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांचे नेते एकत्र येणार आहेत. सुरू केलेल्या उपक्रमांच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी आणि भविष्यातील सहकार्यासाठी संभाव्य क्षेत्रे ओळखण्याची ही शिखर परिषद मोलाची संधी देईल, असे परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.



आपल्या दौ–यात पंतप्रधान मोदी रशियामध्ये ब्रिक्स सदस्य देशांच्या प्रमुखांसोबत द्विपक्षीय बैठका घेऊ शकतात.

ब्रिक्स सदस्य देश रशिया यंदा ब्रिक्सचे अध्यक्षपद भूषवत आहे. ब्रिक्समध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यांचा समावेश आहे. सौदी अरेबिया, इराण, इथियोपिया, इजिप्त, अर्जेंटिना आणि संयुक्त अरब अमिराती हे त्याचे नवीन सदस्य आहेत. जुलैमध्ये पंतप्रधान मोदी रशियाला गेले होते यापूर्वी ८ जुलै रोजी पंतप्रधान मोदी दोन दिवसांसाठी रशियाला गेले होते. येथे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रशियाचा सर्वोच्च नागरी सन्मान ऑर्डर ऑफ सेंट अँर्ड्यू द अपॉस्टल देऊन सन्मानित केले. यावर पीएम मोदींनी पुतीन यांचे आभार मानले. हा १४० कोटी भारतीयांचा सन्मान असल्याचे ते म्हणाले होते.

# संपादकीय....

## संस्थात्मक उभारणी महत्त्वाची

२०२४ चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक डॅरॉन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन यांना जाहीर झाले. या तीन अर्थशास्त्रज्ञांनी देशाच्या समृद्धीसाठी सामाजिक संस्थांचे महत्त्व दाखवून दिले आहे. रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेसच्या नोबेल समितीने म्हटले आहे की, संस्थांची निर्मिती आणि त्यातील बदल ही परिस्थिती समजून घेण्यासाठी या तिघांनी एक मॉडेल तयार केले आहे जे तीन घटकांवर (फॅक्टर) आधारित आहे. हा पुरस्कार यासाठी देण्यात आला आहे की, कशा संस्था देशाची समृद्धी वाढवण्यास मदत करतात. या तिघा संशोधकांनी हे दाखवून दिले आहे की कमकुवत कायदे आणि शोषण करणार्या संस्था समाज विकास करण्यात आणि प्रगती करण्यात अपयशी ठरतात. संस्थांची निर्मिती आणि त्यांच्या प्रभावाचा अभ्यास करून या तिघांनी सततचा होणारा विकास आणि समृद्धीसाठी आवश्यक परिस्थिती यावर प्रकाश टाकला आहे. डॅरॉन एसेमोग्लू हे आर्मेनियन वंशाचे तुर्की-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ आहेत, जे मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये शिकवतात. ते तेथील अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत. १९९३ पासून एमआयटीशी संबंधित एसेमोग्लू यांनी त्यांच्या संशोधन कार्यात राजकीय आणि आर्थिक संस्थांचा प्रभाव समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे कार्य हे प्रतिबिंबित करते की संस्था विकास आणि समृद्धीवर कसा प्रभाव पाडतात. ते ग्रुप ऑफ थर्टीचे सदस्यही आहे. सहा पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे, ज्यात न्यूयॉर्क टाइम्सचे बेस्टसेलर व्हाय नेशन्स फेल : पॉवर, प्रोस्पेरिटी आणि पॉव्हर्टी (जेम्स ए. रॉबिन्सन यांच्यासोबत संयुक्त), इंट्रोडक्शन टू मॉडर्न इकॉनॉमिक ग्रोथ, द नॅरो कॉरिडॉर: स्टेट्स, सोसायटीज आणि द फेट ऑफ लिबर्टी (जेम्स ए. रॉबिन्सन सोबत) आणि पॉवर अँड प्रोग्रेस: अवर थाउजंड इयर स्ट्रगल ओव्हर टेक्नॉलॉजी अँड प्रोस्पेरिटी (सायमन जॉन्सनसोबत). डॅरॉन एसेमोग्लू यांच्या संशोधनात राजकीय आणि आर्थिक संस्था एखाद्या देशाच्या समृद्धीवर कसा परिणाम करतात यावर लक्ष केंद्रित करते. 'व्हाय नेशन्स फेल' या पुस्तकात त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की सर्वसमावेशक संस्था आर्थिक विकासास कशाप्रकारे चालना देतात. सायमन एच. जॉन्सन एक ब्रिटिश अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ आहे. ते एमआयटी स्लोन स्कूल ऑफ मॅनेजमेंट येथे उद्योजकतेचे प्राध्यापक आहेत आणि पीटरसन इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स येथे वरिष्ठ फेलो आहेत. ड्यूक युनिव्हर्सिटीच्या फुक्वा स्कूल ऑफ बिझनेसमध्ये (१९९१-१९९७) अर्थशास्त्राच्या सहयोगी प्राध्यापकासह त्यांनी विविध शैक्षणिक आणि धोरण-संबंधित पदे भूषवली आहेत. मार्च २००७ ते ऑगस्ट २००८ अखेर, ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ होते. २०२३ मध्ये त्यांचे पॉवर अँड प्रोग्रेस हे तंत्रज्ञानाच्या ऐतिहासिक विकासावर आणि तंत्रज्ञानाच्या सामाजिक आणि राजकीय परिणामांवरील पुस्तक प्रकाशित झालेले आहे. या पुस्तकामध्ये नवीन मशिन्स आणि उत्पादन तंत्र आणि मजुरी यांच्यातील संबंध, सामाजिक वस्तूंसाठी तंत्रज्ञानाचा वापर कोणत्या मार्गावर केला जाऊ शकतो आणि कृत्रिम बुद्धिमत्तेबद्दलची उत्सुकता आहे. सायमन जॉन्सनचे कार्य प्रामुख्याने संस्था आणि तंत्रज्ञानाच्या अर्थशास्त्राशी संबंधित आहे. काही तंत्रज्ञान आर्थिक संधी कशी निर्माण करू शकते आणि असमानता कशी कमी करू शकते, याविषयीचे आहे. जेम्स लन रॉबिन्सन, एक ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय शास्त्रज्ञ आहे. ते सध्या रेव्हरंड डॉ. रिचर्ड एल. ग्लोबल कॉन्फ्लिक्ट स्टडीजचे प्राध्यापक आहेत. शिकागो विद्यापीठातील हॅरिस स्कूल ऑफ पब्लिक पॉलिसीमध्ये पीअरसन प्राध्यापक आहेत. हुकूमशाही आणि लोकशाहीची पहिली आर्थिक उत्पत्ती, लोकशाही आणि हुकूमशाहीच्या उदय आणि स्थिरतेचा सिद्धांत त्यांनी मांडला. त्यांचे दुसरे पुस्तक व्हाय नेशन्स फेल: द ओरिजिन ऑफ पॉवर, प्रॉस्पेरिटी अँड पॉव्हर्टी (२०१२ मध्ये प्रकाशित झाल्यापासून ४१ भाषांमध्ये अनुवादित झालेले आहे), तुलनात्मक विकासावर त्यांचे बरेचसे संयुक्त संशोधन एकत्र केले आणि काही देश आर्थिकदृष्ट्या का भरभराटीला आले आणि इतर गरिबीत का पडले आहेत, याचा सिद्धांत मांडला. त्यांचे सर्वात अलीकडील पुस्तक, द नॅरो कॉरिडॉर : स्टेट्स, सोसायटी अँड द फेट ऑफ लिबर्टी, राज्ये आणि समाज यांच्यातील अखंड आणि अपरिहार्य संघर्षाचे परीक्षण करते आणि आधुनिक जगाला आकार देणार्या सखोल ऐतिहासिक प्रक्रियांचे वर्णन देते. जेम्स ए. रॉबिन्सन यांनी राजकीय संस्थांवर आणि आर्थिक विकासामध्ये त्यांची काय भूमिका बजावली यावर लक्ष केंद्रित केले. वसाहती संस्थांनी विविध आर्थिक परिणाम कसे साधले याची त्यांनी तपासणी केली. या तिन्ही अर्थतज्ज्ञांनी वर्षानुवर्षे प्रगती करूनही गरीब देशांचा श्रीमंत देशांसारखा विकास कसा होऊ शकला नाही, हे त्यांच्या संशोधनात सांगितले आहे. समाजावर राजकीय संस्थांचा प्रभाव त्यांनी ३ प्रकारे स्पष्ट केला आहे- प्रथम- संघर्ष : संसाधनांचे वितरण कसे केले जाते? समाजात निर्णय घेण्याचा अधिकार कोणाकडे आहे? याच आधारावर श्रीमंत वर्ग आणि सामान्य लोक यांच्यात संघर्ष आहे. दुसरे- संघटन : जनता संघटित होऊन कधी कधी सत्ताधारी वर्गाला धमकावते. असे करून ते सरकारला त्यांच्या म्हणण्याशी सहमती घेतात. त्यामुळे निर्णय घेण्याच्या अधिकारापेक्षा समाजातील सत्ता अधिक आहे, असे म्हणता येईल. तिसरे- सत्ती/बांधिलकी : उच्चभ्रू लोकांसाठी निर्णय घेण्याची शक्ती जनतेच्या हाती सोपवणे हा पर्याय आहे. सामाजिक संस्थांमधील फरक जगातील सर्वात श्रीमंत २० टक्के देश आता सर्वात गरीब २० टक्के देशांपेक्षा ३० पट श्रीमंत आहेत. शिवाय, सर्वात श्रीमंत आणि गरीब देशांमधील उत्पन्नातील असमानता दिसून येते. जरी सर्वात गरीब देश श्रीमंत झाले असले तरी, ते सर्वात समृद्ध देशांबरोबर बरोबरी करू शकत नाही. या वर्षाच्या विजेत्यांना या सततच्या अंतराच्या स्पष्टीकरणासाठी नवीन आणि खात्रीलायक पुरावे सापडले आहेत ते म्हणजे समाजाच्या संस्थांमधील फरक. युरोपियन वसाहतकर्त्यांनी सादर केलेल्या विविध राजकीय आणि आर्थिक प्रणालींचे परीक्षण करून, डॅरॉन एसेमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन हे तिघे संस्था आणि समृद्धी यांच्यातील संबंध दाखवण्यात यशस्वी झाले आहेत. त्यांनी सैद्धांतिक साधनेदेखील विकसित केली आहेत, जी संस्थांमधील मतभेद का टिकून राहतात आणि संस्था कशा बदलू शकतात हे स्पष्ट केले आहे. एखादी सशक्त आणि निष्पक्ष संस्था. उदाहरणार्थ, चांगले सरकार आणि कायदा व्यवस्था लोकांच्या आयुष्यावर कसा सकारात्मक परिणाम करते आणि लोकांचे आयुष्य कसे सुखकर करते हे त्यांच्या संशोधनातून समोर आले आहे. राष्ट्रांचे आर्थिक यश आणि अपयश विविध संस्थांवर अवलंबून असते.

# काँग्रेस-भाजपाने अनुसूचित जाती-जमाती यांचे,'आरक्षण' उध्वस्त केले

जागतिकीकरणाच्या युगात भारताचे सार्वभौम लोकशाही गणराज्य उभे आहे हे विधान अर्थपूर्ण आहे. अर्थपूर्ण यासाठी की जागतिकीकरण आणि लोकशाही या भांडवली व्यवस्थांत संघर्ष उभा राहताना आपण पाहतो आहोत. जागतिकीकरणाला एकीकडे स्वातंत्र्य, समता, न्याय, दर्जा, प्रतिष्ठा, संधी, राष्ट्राची एकात्मता, बंधुता हे लोकशाहीचे आग्रह नको आहेत. किंबहुना लोकशाही ज्या मार्गाने या मूल्यांची प्रतिस्थापना करू पाहते आहे ते मार्गच जागतिकीकरणाला नको आहेत. जागतिकीकरण मानवी जीवनाला अस्थिर, असुरक्षित ठेवू पाहत आहे, तर मानवी जीवनाला स्थैर्य, सुरक्षितता प्रदान करण्यासाठी लोकशाही धडपडत आहे. भांडवलाच्या जोरावर जागतिकीकरणाने माणसालाच बाजारपेठेत उभे करून त्याला विक्रीयोग्य बनवले आहे, तर लोकशाही बाजारपेठेसाठी नसून बाजारपेठ माणसासाठी आहे असे निक्षून सांगत आहे. खासगीकरण हे जागतिकीकरणाचे ब्रीद आहे तर सम्यक सार्वत्रिकीकरण हे लोकशाहीचे ब्रीद आहे.या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेने ६३ वर्षांपूर्वी भारताचे सार्वभौम लोकशाही गणराज्य प्रस्थापित करण्याचे व त्याच्या प्रत्येक नागरिकास सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय देण्याचे; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य देण्याचे; दर्जा व संधीची समानता प्राप्त करून देण्याचे; त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्रा ची एकता आणि एकात्मता अशी जी काही आश्वासने दिली आहेत त्या आश्वासनांच्या पूर्तीसाठी लागणारी परिस्थिती निर्माण करण्यात आपल्याला कितपत यश आले हा आज महत्त्वाचा प्रश्न आहे. जागतिकीकरण आणि राज्यघटनात्मक आश्वासने यांच्यात जो संघर्ष आहे तो वैचारिक पातळीवर पाहता अत्यंत मोलाचा आहे. कारण जागतिकीकरण हा विचार आहे तसाच लोकशाही हाही विचारच आहे. म्हणून भारतात १९९० नंतर जो वैचारिक संघर्ष निर्माण झाला आहे तो एकेरी नाही तर तो भांडवलशाही विरुद्ध लोकशाही, भांडवलशाही विरुद्ध समाजवाद, भांडवलशाही विरुद्ध वर्ण-जात-वर्गव्यवस्था, असाच राहिला आहे. भारतीय राज्यघटना 'सार्वभौम लोकशाही गणराज्य' स्थापन करण्याचे आश्वासन देते. परंतु जागतिकीकरणाची संकल्पना ही सार्वभौमत्व संकल्पनेच्या विरोधी आहे. कारण सार्वभौमत्वामुळे जी बंधने जागतिकीकरणावर येतात ती बंधनेच नव्हे तर इतर सर्व प्रकारच्या बंधनांच्या अनावश्यकतेचा विचारच जागतिकीकरण मांडते. भारतात १९९० पासून ते संघर्ष अधिक गतिमान झालेले दिसतात. म्हणून जागतिकीकरण आहे त्या स्वरूपात स्वीकारले तर भारताचे सार्वभौमत्व धोक्यात येण्याची जास्त शक्यता आहे. याचे भान भारताच्या घटनांतर्गत सुजाण नागरिकांनी, विधिमंडळांनी, कार्यकारी मंडळांनी व न्यायमंडळांनी ठेवणे गरजेचे आहे. देशाचे सार्वभौमत्व विकसित राष्ट्रांकडे गहाण ठेवता कामा नये. कारण सार्वभौमत्व हे तर कोणत्याही लोकशाही राष्ट्रा ची स्वाभिमानाभिव्यक्ती असते. भारतीय राज्यघटना लोकशाही गणराज्य स्थापन करण्याचे आश्वासन देते. मात्र या ठिकाणीही जागतिकीकरण व 'लोकशाही गणराज्य' या संकल्पनांत विरोध निर्माण होताना दिसतो. कारण 'जागतिकीकरण' ही भांडवलाच्या अतिरेकातून निर्माण झालेली विचारसरणी आहे तर 'लोकशाही' ही भांडवलाचे केंद्रीकरण व त्यातून परिपूर्त होणा-या भांडवलशाहीच्या विरोधात निर्माण झालेली विचारसरणी आहे. जागतिकीकरणाला 'शाही' अर्थात 'राज्य' हवे ते लोकांचे नाही तर भांडवलदारांचे. त्यात लोक केवळ ग्राहक, वस्तू, कामगार, शोषित स्वरूपातच हवेत. मानवी समाजाचे रूपांतर मानवी बाजारपेठेत करणे हे जागतिकीकरणाचे लक्ष्य आहे, तर विवेकाधिष्ठित मानवी समाजाची निर्मिती करणे हे लोकशाहीचे लक्ष्य आहे. माणसाने काय घालावे आणि काय घालू नये, याबद्दलचे स्वातंत्र्य माणसाला असले तरी ते तसे नसते. ते ठरवण्याचे काम बाजारपेठ करीत असते. भारतीय राज्यघटनेने सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक,आर्थिक,राजकीय न्याय प्राप्त करून देण्याचे आश्वासन दिले आहे. परंतु जागतिकीकरण ही सामाजिक न्यायाच्या विरोधी संकल्पना आहे. कारण अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्राचे अस्तित्व शेतक-यांना व कुटीरोद्योगांना देण्यात येणा-या सवलती, खतांवरील सवलती, रॉकेलवरील सवलत, शिक्षणात सवलती, मागास जाती-जमाती, अल्पसंख्याक स्त्रियांसाठीचे आरक्षण, घटनेतील कलम- १४, १५, १६, १९, कलम- ४५, इ. हे सर्व सामाजिक न्यायाच्या परिपूर्तीसाठीच्या तरतुदी आहेत. जागतिकीकरणामुळे या तरतुदी धोक्यात आल्या आहेत. जागतिकीकरण आणि आर्थिक न्यायाची संकल्पना यांच्यात द्वंद्व निर्माण झालेले दिसते. जागतिकीकरणाला आर्थिक न्याय नको असून फक्त नफा हवा आहे की जो मार्क्सनुसार श्रमिकांच्या अतिरिक्त श्रमातून निर्माण होतो व त्यावर त्यांचाच हक्क आहे. भारतात अद्यापही ७०% जनता खेड्यात राहते. अनु.जाती-अनु. जमाती व इतर मागास वर्गातील सर्व स्त्री-पुरुष 'ब्रोकन पीपल्स' अजूनही आर्थिक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. आर्थिक ध्येयधोरणांसंदर्भात अंतिम विचार करण्याचे काम संसदेवर सोपवले आहे. ते कसे धोकादायक ठरू शकते हे डंकेल प्रस्ताव, गॅट, अणुऊर्जा, एफडीआय इ. विषयक निर्णयांवरून दिसून येते. राजकीय न्यायाच्या बाबतीत मात्र भारतीय गणराज्याने ब-या पैकी यश मिळवले असले तरी ते पुरेसे नाही. देशातील वंचितांना राजकीय न्याय मिळालेला दिसत नाही. हे दारिद्र्य, आरोग्य, शिक्षण, महिला आरक्षण, अनु. जाती-जमाती आरक्षणाच्या मुद्द्यांवरून लक्षात येते. यावरून एक प्रश्न उपस्थित करता येतो. तो हा की, भारतात प्रजासत्ताकाच्या स्थापनेपासून सत्तेत आलेल्या सत्ताधा-यांना जनतेला खरोखरीच सामाजिक-आर्थिक-राजकीय न्याय द्यावयाचा होता का? जर खरंच द्यावयाचा असेल तर सत्ताधारी हे का जाणून घेत नाहीत की जोपर्यंत ते अर्थव्यवस्थेचे घटनाधिष्ठित समाजवादीकरण करीत नाहीत, अर्थात घटनात्मक समाजवादी अर्थव्यवस्था स्थापन करीत नाहीत, तोपर्यंत ते भारतीय जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय देऊ शकत नाहीत. पण मग स्वीकारलेल्या जागतिकीकरणाचे, मुक्त आर्थिक धोरणाचे काय करायचे, हा प्रश्न उभा राहू शकतो. जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या संपत्तीतून नवीन प्रश्न उभे राहत आहेत. जसे देशात निर्माण झालेल्या संपत्तीचे मालक कोण आहेत व राहतील? संसाधनांतून निर्माण झालेल्या संपत्तीचे वाटप कोण करणार? वित्त आयोग, नियोजन आयोग की भांडवलदार? भारतात संपत्तीच्या बाबतीत समता कधीच नव्हती म्हणूनच आर्थिक न्यायाचा विचार मांडणारी राज्यघटना भविष्यात निर्माण होणा-या संपत्तीचे समान वाटप करण्यासाठी काही पावले उचलणार का? गरीब व श्रीमंत यांच्यातली दरी कमी होण्याऐवजी ती वाढतच चालली आहे. त्यातून सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्या वाढत आहेत. या गुंतागुंतीतूनच भारताच्या लोकशाही गणराज्याच्या समाजाची, राजकारणाची, अर्थकारणाची, न्यायकारणाची वीण विणली जात आहे. याची गांभीर्यपूर्वक जाणीव भारतीय लोकशाही गणराज्याने ठेवावी ही अपेक्षा.



काँग्रेसचे तत्कालीन पंतप्रधान पीव्ही नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळातील तत्कालीन अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांनी केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला आणि औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन देऊन आर्थिक धोरणांमध्ये सुधारणा सुरू केल्या.सरकारने आयात मर्यादित करून भांडवली वस्तूंच्या उत्पादनासाठी गुंतवणूक करण्याचे निर्देश दिले.हे नवीन औद्योगिक धोरण एलपीजी किंवा उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण मॉडेलवर आधारित होते.भारतीय अर्थव्यवस्थेला परवाना राज शासनापासून दूर करून चोर पावलाने जागतिकीकरनाच्या गोंडस नावाखाली उदारीकरण, खाजगीकरण नवीन जागतिक धोरणाच्या अडून मिश्र-अर्थव्यवस्था या भारतीय धोरणाला सुरुंग लाऊन उध्वस्त केले. १९९१ च्या तत्कालीन काँग्रेसचे अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांचा जागतिकीकरण धोरणाचा अर्थसंकल्प कायम ठेऊन १९९९ मध्ये वाजपेयी यांनी त्यांच्या सरकारमध्ये निर्गुतवणूक मंत्रालय म्हणून एक नवीन मंत्रालयच तयार केले. ज्यांचे मंत्री म्हणून अरुण शौरी यांची नियुक्ती झाली. खासगीकरणाच्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्याचे काम मंत्रालयाचे होते. वाजपेयी यांच्या नेतृत्वात शौरी यांच्या मंत्रालयाने भारत ल्युमिनियम कंपनी , हिंदुस्तान झिंक, इंडियन पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड आणि विदेश संचार निगम लिमिटेड यांची विक्री सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि भारतीय सार्वजनीक उद्योग खाजगी कंपन्यांना विकण्याचा प्रघात पाडला आणि भारतीय संविधानाला उध्वस्त करण्याचा जहरी मार्ग काँग्रेसच्या नरसिंहराव आणि भाजपाच्या अटलबिहारी वाजपेयी यांनी निवडला हे लपून राहीलेले नाही. एकेकाळी या सार्वजनीक क्षेत्रातील सरकारी कंपन्यांची संख्या ३८० पर्यंत पोहोचली होती.आर्थिक वर्ष १९९१-९२ ते २०१७-१८ पर्यंत भारत सरकारने एकूण ३,४७,४३९ कोटींची सार्वजनिक मालमत्ता काँग्रेस आणि भाजपा सरकारने विकली आहे तर मोदी-शहा सरकारने तर अलिकडच्या वर्षांत सार्वजनिक क्षेत्र अमाप अदानी -आडानी यांना विक्री करून उच्चांक गाठला आहे. सार्वजनीक क्षेत्रातील उद्योगाचे खाजगीकरण केले म्हणजे या उद्योग क्षेत्रातील अनुसूचित जाती/ जमाती यांचे नौकरीतील आरक्षण रद्द करण्यात आले असे म्हणता येईल. खासगीकरणात कंत्राटी फिक्स पे नौकरी असते ही बाब लक्षात ठेवने गरजेचे आहे. भारताची मिश्र अर्थव्यवस्था आर्थिक कल्याणावर भर देते. वित्तीय आणि आर्थिक धोरणे खाजगी संस्थांना मोठ्या आर्थिक कल्याणासाठी योगदान देण्यास उद्युक्त करतात, तर सार्वजनिक क्षेत्र रोजगाराच्या संधी प्रदान करते. यातूनच शासकीय, निमशासकीय नौकरी संधी निर्माण होतात अनुसूचित जाती/जमाती यांना आरक्षणाच्या सवलती दिल्या जातात म्हणून आरक्षण विरोधी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे समर्थक काँग्रेस पक्षाचे तत्कालिन प्रधानमंत्री पी.व्ही.नरसिंहराव व भाजपाचे अटलबिहारी वाजपेयी यांनी अत्यंत थंड डोक्याने आणि चाणाक्ष बुद्धीने आर्थिक सुधारणाच्या बहाण्याने लोकशाही आणि संविधान अबाधित ठेऊन अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय यांच्या आरक्षणाच्या नरडीला नख लावले आहे हे त्रिकालाबाधित सत्य आहे. काँग्रेसच्या पोटात (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) ठड्ड आहे तर भाजपाच्या ओठात (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ)ठड्ड आहे. हे विसरता येणार नाही. मग संविधानाचे रक्षण काँग्रेस करेल यावर विश्वास ठेवणे घातक ठरेल. काँग्रेसने ग्लोबलायझेशन मार्गे आरक्षण संपवण्याचा पाया रचला,मोदींनी खाजगीकरण करून नौकरीतील आरक्षण संपवून,'कळस' रचला हे एक सत्य आहे त्यामुळेच संविधान वाचवण्याची जबाबदारी वंचित घटकांना आपल्या खांद्यावर घ्यावी लागेल यात तिळमात्र शंका नाही.

******

शब्दांकन
एन. पि. सरवदे
९९७५४८४८८४

# रजोनिवृत्तीचा महिलांच्या हाडे आणि हृदयाच्या आरोग्यावर कशाप्रकारे परिणाम होतो? जाणून घेऊया सविस्तर

सर्व महिलांना जीवनातील टप्प्यादरम्यान रजोनिवृत्तीचा सामना करावा लागत असला तरी अनेक महिलांना रजोनिवृत्तीमुळे त्यांचे आरोग्य व स्वास्थ्यावर होणाऱ्या परिणामांबाबत माहित नाही. या स्थितीबाबत फारशी चर्चा करण्यात आलेली नाही, ज्यामुळे महिलांना जीवनातील या भावी टप्प्यासाठी सुसज्ज राहणे अवघड होते. रजोनिवृत्तीमुळे विविध प्रकारचे बदल होऊ शकतात. काही महिलांना पीरियडदरम्यान होणाऱ्या वेदनांपासून आराम मिळण्याचे वाटू शकते, आत्म-शोधाची भावना जागृत होऊ शकते आणि पुढे काय घडणार याबाबत उत्सुकता निर्माण होऊ शकते. पण या टप्प्यादरम्यान महिलांच्या शरीरात बदल होण्यासोबत इस्ट्रोजेन पातळ्यांमध्ये घट होते हे लक्षात असणे देखील महत्त्वाचे आहे. या बदलांमुळे महिलांना रजोनिवृत्तीनंतर आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत माहित असणे आवश्यक आहे. मुंबईतील सूर्या हॉस्पिटल येथील प्रसूती व स्त्रीरोग विभागाच्या संचालक डॉ. सुचित्रा पंडित म्हणाल्या, भारतातील रजोनिवृत्ती घेणाऱ्या महिलांवर आधारित संशोधनांमधून निदर्शनास आले की नोंदणी झालेली सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे वेदनादायी चमक व रात्रीच्या वेळी घाम येणे, तसेच इतर लक्षणे जसे झोप न लागणे, चिंता, चिडचिड, सांधेदुखी आणि योनीमार्गात कोरडेपणा.इंडियन मेनोपॉज सोसायटीने केलेल्या संशोधनामध्ये या लक्षणांचे प्रमाण ७५ टक्के असल्याचे आढळून आले. या लक्षणांबाबत जागरूकता हळूहळू वाढत असली तरी आम्हाला अंदाज आहे की कमी महिलांना रजोनिवृत्तीचा आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत माहित आहे.

ज्यामुळे अधिकाधिक महिलांना रजोनिवृत्तीनंतरच्या सामान्य स्थितींबाबत माहित असण्याची अधिक गरज आहे. इस्ट्रोजेन पातळ्या कमी झाल्यामुळे महिलांना ऑस्टियोपोरासिस, हृदयसंबंधित आजार आणि मसल मास लॉसचा मोठा धोका असू शकतो. रजोनिवृत्तीच्या हाडे व हृदयाच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत माहित असल्याने त्यांना परिणामांना ओळखण्यासोबत त्यावर प्रतिबंध ठेवण्यास किंवा लवकर निराकरण करण्यास मदत होऊ शकते.

अबॉट इंडियाच्या मेडिकल अफेअर्स हेड डॉ. रोहिता शेट्टी म्हणाल्या, महिलांना रजोनिवृत्तीचा हाडे व हृदयाच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत समजण्यास मदत करणे महत्त्वाचे आहे. ॲबॉट व इप्सोसने केलेल्या सर्वेक्षणानुसार ८२ टक्के व्यक्तींचा विश्वास आहे की रजोनिवृत्तीचा महिलांच्या वैयक्तिक स्वास्थ्यावर परिणाम होतो. यामुळे महिलांना रजोनिवृत्तीदरम्यान व त्यानंतरच्या काळामध्ये त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास मदत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रजोनिवृत्तीनंतर होणारा सर्वात सामान्य आजार म्हणजे ऑस्टियोपोरोसिस, जो ५० वर्षांवरील तीनपैकी एका महिलेला होतो. इस्ट्रोजेनच्या पातळ्यांमध्ये घट झाल्यामुळे हा आजार होतो, परिणामत: हाडांची झीज होते व स्नायूबळ कमकुवत होते, ज्यामुळे ते तुटण्याचा धोका वाढतो.आज भारतातील जवळपास ६१ दशलक्ष व्यक्तींना ऑस्टियोपोरोसिस आहे आणि त्यांच्यापैकी ८० टक्के महिला आहेत.ऑस्टियोपोरोससि हा 'मूक आजार आहे, ज्यामध्ये फ्रॅक्चर होत नाही तोपर्यंत लक्षणे दिसून येत नाही. कधी-कधी उंची कमी होऊ शकते, ज्यासोबत पाठदुखी किंवा पाठीला पोंग येऊ शकते. ऑस्टियोपोरोसिसशी संबंधित दुखापती गंभीर असू शकतात आणि वेदना होण्यासोबत दीर्घकाळापर्यंत विकलांगत्व येऊ शकते.डॉक्टरांसोबत सल्लामसलत आणि जोखीम घटक जाणून घेणे महत्त्वाचे ठरू शकते. हाडे मजबूत करण्यासाठी जीवनशैलीमध्ये काही बदल करता येऊ शकतात, जसे नियमितपणे व्यायाम करणे, फळे, भाज्यांचा समावेश असण्यासोबत कॅल्शियम व व्हिटॅमिन डी ने संपन्न आरोग्यदायी आहाराचे सेवन करणे, धूम्रपान व मद्यपान न करणे. रजोनिवृत्तीनंतर महिलांना स्नायूबळ कमकुवत होण्याचा देखील धोका असतो. वाढत्या वयासह हालचाल, संतुलन व ताकदीसाठी स्नायूबळ मजबूत असणे आवश्यक आहे. स्नायूबळ कमी होणे किंवा सार्कोपेनिया महिलांमध्ये झपाट्याने वाढत होते, रजोनिवृत्तीमुळे पुरुषांच्या तुलनेत जवळपास एक दशक अगोदर महिलांना त्यांचा त्रास होत आहे. यासोबत इतर गुंतागूंती देखील होतात जसे वजन कमी होणे आणि पायऱ्या चढण्यासारखी सोपी कामे करताना त्रास होतो. थकवा व ऊर्जा कमी होणे या चेतावणी लक्षणांकडे लक्ष द्या, त्यासंदर्भात डॉक्टरांचा सल्ला देखील घ्या. स्नायूबळ वाढवण्यासाठी सक्रिय पावले उचलू शकता, जसे ताकदीसाठी व्यायाम, स्नायूंसाठी फायदेशीर ठरणारे व्यायाम, पौष्टिक आहाराचे सेवन आणि पुरेशी झोप घेणे. रजोनिवृत्तीनंतर हृदयविषयक आजाराचा धोका देखील वाढतो. यामागील कारण म्हणजे इस्ट्रोजेनच्या कमतरतेमुळे लिपिड पातळ्यांमध्ये बदल होऊ शकतात, जसे कोलेस्ट्रॉलमध्ये वाढ होऊ शकते.रजोनिवृत्तीशी संबंधित वेदनादायी चमक व रात्रीच्या वेळी घाम येणे यामुळे उच्च रक्तदाब आणि इतर कार्डियोव्हॅस्कुलर संबंधित जोखीम घटकांचा धोका वाढू शकतो.तसेच, वयाच्या उत्तरार्धात नैसर्गिकपणे रजोनिवृत्ती येणाऱ्या महिलांना कार्डियोव्हॅस्कुलर आजाराचा धोका कमी असतो. रजोनिवृत्ती लवकर येण्यास कारणीभूत असू शकणारे घटक म्हणजे प्रजनन काळामध्ये कार्डियोव्हॅस्कुलर आरोग्य बिघडणे, धूम्रपान आणि शक्यतो अनुवांशिकता.

संशोधनामधून देखील निदर्शनास येते की रजोनिवृत्तीदरम्यान नैराश्यामुळे कार्डियोव्हॅस्कुलर आजाराचा धोका उच्च असू शकतो.समुपदेशन, कॉग्निटिव्ह बीहेवीरल थेरपी किंवा माइंडफुलनेस पद्धतींच्या माध्यमातून या समस्यांचे निराकरण करणे महत्त्वाचे आहे, तसेच सामाजिक पाठिंबा देखील महत्त्वाचा आहे.

थोडक्यात, वाढत्या वयासह महिलांनी नियमित तपासणी, विशेषत: रजोनिवृत्तीनंतर आरोग्य तपासणी करणे महत्त्वाचे आहे. कोणत्या लक्षणांकडे लक्ष देणे गरजेचे आहे हे माहित असल्यास तुम्ही व तुमचे प्रियजन रजोनिवृत्तीनंतर उत्तमप्रकारे जीवन जगू शकतात आणि जीवनातील या टप्प्याचा सहजपणे स्वीकार करू शकतात.

# भारतीय बौद्ध महासभा शाखा सिवुडस च्या वतीने वर्षावास मालिकेचा शानदार सांगता समारोह संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :- भारतीय बौध्द महासभा नवी मुंबई जिल्हाअंतर्गत सिवुडस (प) शाखेच्या वतीने शाखेचे अध्यक्ष संजय झनके गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या जल्लोशात दिनांक १७ / १० /२०२४ रोजी अश्विन पौर्णिमेचे औचित्य साधुन वर्षावास धम्मप्रवचन मालिकेचे १९ वे पुष्प समारोप सुंदररित्या गुंफण्यात आले. सर्वप्रथम उपस्थित प्रवचनकार अनिल शिंदे गुरुजी (केंद्रिय शिक्षक) उपाध्यक्ष - संरक्षण नवी मुंबई जिल्हा व माजी जिल्हाध्यक्ष - नवी मुंबई जिल्हा यांच्या हस्ते व डॉ. संतोष कुसरे ( उपाध्यक्ष - सिवुडस व माजी अध्यक्ष - सिवुडस शाखा ) इतर उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते आदर्शांची पुजा व दिपपुजा करण्यात आली. सर्वप्रथम सामुहिक सुत्रपठण घेण्यात आले. समता सैनिक दल नवी मुंबई जिल्हा बटालियन यांनी कडक सलामी दिली. प्रवचनकार बौद्ध धम्माचे गाढे अभ्यासक अनिल शिंदे गुरुजी ( केंद्रिय शिक्षक ) तद्वतच उपाध्यक्ष - संरक्षण नवी मुंबई जिल्हा व मेजर नवी मुंबई जिल्हा आणि माजी जिल्हाध्यक्ष नवी मुंबई यांनी त्यांच्या दांडग्या अनुभवातुन प्रभावशाली कार्यशैलीत अश्विन पौर्णिमा - कालाम सुत्त व मानवमुक्तिचा जाहिरनामा या विषयावर खुपच अप्रतिम प्रवचन दिले. त्यांच्या प्रवचनाने उपासक व उपासिका भारावून गेले. अनिल शिंदे गुरुजींचे धन्यवाद ! चांगले धम्मामृत दिल्याबद्दल सिवुडस शाखा आभारी आहे. आजच्या कार्यक्रमासाठी केंद्रिय उपविभाग प्रमुख महिला बचत गटाच्या अध्यक्षा रागिणीताई पवार (केंद्रिय शिक्षिका ), जिवन वाडते गुरुजी - पालीभाषा अभ्यासक तद्वतच सरचिटणीस - नवी मुंबई जिल्हा ), शोभाताई कांबळे ( जिल्हाध्यक्ष - महिला कमिटी नवी मुंबई जिल्हा ), ज्योतिताई जाधव (सरचिटणीस नवी मुंबई जिल्हा महिला कमिटी ), छायाताई दिवे ( कोषाध्यक्ष - नवी मुंबई जिल्हा महिला कमिटी ), यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्यात. आजच्या वर्षावास धम्मप्रवचन प्रवचन मालिका समारोप कार्यक्रमासाठी विनोद पाचपिंडे गुरुजी ( सचिव - पर्यटन नवी मुंबई जिल्हा





), चांदणीताई पाचपिंडे ( उपाध्यक्ष - पर्यटन नवी मुंबई जिल्हा महिला कमिटी ), दिपक कांबळे गुरुजी - सचिव - संरक्षण नवी मुंबई जिल्हा व प्लाटुन कमांडर नवी मुंबई जिल्हा. मा.अजाबराव वानखेडे गुरुजी ( ऊ०.समता सैनिक दल बुलडाणा ), त्याचप्रमाणे आजच्या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणुन आयु. सुनिल भोले (अध्यक्ष - वंचित बहुजन आघाडी बेलापुर तालुका ), गौतम चव्हाण ( महासचिव - बेलापुर तालुका ), कल्याणराव हणवते ( बौद्धाचार्य ) व पत्रकार तद्वतच उपाध्यक्ष - वंचित बहुजन आघाडी बेलापुर तालुका ), अशोक साळवे - माजी नेरुळ विभाग अध्यक्ष ), ड. उमेश हातेकर - अध्यक्ष - सिवुडस विभाग ), दिलिप गायकवाड ( मा. उपाध्यक्ष - बेलापुर तालुका ), अशोक गायकवाड ( वरिष्ठ कार्यकर्ते ), राहुल शिरसाट ( मा. उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी बेलापुर तालुका ), ड. उमेश हातेकर यांनी सुद्धा वंचित बहुजन आघाडी बेलापुर तालुका उपस्थित नवीन कार्यकारिणीचा सत्कार केला. मा. विजय झनके गुरुजी (केंद्रिय शिक्षक व अध्यक्ष - करावे गांव शाखा ) व इतर करावे गांवचे उपासक व उपासिका व सैनिक यांनी शोभा वाढविली. सिवुडस शाखेचे पदाधिकारी मा. संजय झनके (अध्यक्ष), डॉ. संतोष कुसरे ( उपाध्यक्ष - सिवुडस शाखा ), जयराम कदम ( कोषाध्यक्ष - सिवुडस शाखा ), डि.एच. जगताप (सचिव - संस्कार सिवुडस शाखा ) उपस्थित होते. सिद्धार्थ सोलसे सरचिटणीस ( सिवुडस शाखा ), सदाशिव ढसाळ ( संघटक - सिवुडस शाखा ), यांनीही व सिवुडस शाखेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी सुद्धा सहकार्य केले. चंद्रकांत यशवंते ( सचिव - संरक्षण ), सुर्यकांत अहिरे हिशोब तपासणीस - सिवुडस शाखा ), शरद हजारे (सचिव - पर्यटन सिवुडस शाखा ), प्रमिलाताई जाधव (संघटक - सिवुडस शाखा ), ड. संदेश मोरे व राहुल जाधव ( मा. जिल्हा - सचिव ) वंचित बहुजन आघाडी, मिलिंद मंडपे ( उपविभाग अध्यक्ष - सिवुडस वंचित बहुजन आघाडी ), उत्तम सावंत, बबन पवार, सुरेंद्र कांबळे, यु. डी. कदम, विनोद मनवर, हिरा रोकडे, पद्मावती गवारे, सुमन होव्हाळ, सुनिताताई ग्रेटकरताई, सिंधु पवार , कुसुम गायकवाड, वसंत दुपटे, गोविंद कांबळे, संतोष वाढवे सरचिटणीस ( करावे गांव शाखा ), प्रजावती वाघमारे, माधुरीताई सरोदे, निता हिरवे मॅडम, सिमाताई झनके, धम्मशिलाताई वाढवे, थोरावडे, विकास सोनवणे, राहुल इंगळे, अनिल पाटील (समाजसेवक) यांनीही खुप मोलाचे चांगले सहकार्य केले. त्यांचे धन्यवाद ! सर्वांनी सलग वर्षावास धम्मप्रवचन मालिकेच्या आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या १९ व्या पुष्पापर्यंत ज्या दानदात्यांनी धम्मप्रवचन मालिकेला हातभार लावुन दानपारमितेचे पालन करून कुशल कर्म संपादन केले. त्या दानदात्यांचे मनापासून धन्यवाद ! सिवुडस शाखेला १९ व्या पुष्पापर्यंत ज्या प्रवचनकार केंद्रिय शिक्षक व शिक्षिकांनी अमुल्य वेळ देवुन धम्मामृत देवुन धम्म प्रचार व प्रसाराचे कार्यास उत्तम हातभार लावलेला आहे. त्यांचे सर्वांचे सिवुडस शाखा आभारी आहे. उपस्थित मान्यवर व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे स्वागत करण्यात आले. वर्षावास धम्मप्रवचन मालिका राबविण्यासाठी आंम्हाला रितसर परवाणगी देवुन शेवटच्या पुष्पापर्यंत चांगले सहकार्य, व सेवा दिली. उर्जा दिली असे जयवंत लव्हांडे गुरुजी ( पालीभाषा अभ्यासक तद्वतच जिल्हाध्यक्ष - नवी मुंबई जिल्हा ) व जिवन वाडते गुरुजी पालीभाषा अभ्यासक तद्वतच सरचिटणीस - नवी मुंबई जिल्हा ), प्रकाश माने गुरुजी मा. जिल्हाध्यक्ष नवी मुंबई तद्वतच विद्यमान कोषाध्यक्ष - नवी मुंबई जिल्हा ) व इतर जिल्हा सहकारी त्याचप्रमाणे उपाध्यक्ष - संस्कार विभाग नवी मुंबई जिल्हा चंद्रकांत माने गुरुजी आणि त्यांचे इतर सहकारी यांनीही सहकार्य केले. धन्यवाद ! शोभाताई कांबळे ( जिल्हाध्यक्ष - महिला कमिटी नवी मुंबई व त्यांचे इतर सहकारी जिल्हा पुरुष कमिटी व जिल्हा महिला कमिटी यांचे सिवुडस शाखा मनापासुन आभारी आहे. दानदाते जिवन वाडते गुरुजी यांनी उपासक व उपासिकांना लाडु धम्मदान दिले. मा. प्रमिलाताई जाधव यांनी खिरदान दिले, ड. उमेश हातेकर यांनी उत्तम भोजन दिले. दानदात्यांचे मनापासून धन्यवाद ! उपस्थित सर्वांचे आभार मानुन सरणत्तय गाथा घेवून वर्षावास धम्मप्रवचन मालिकेतील १९ व्या पुष्पाचा समारोप करण्यात आले.

# रा.कॉं.शरद पवार गटाची उमेदवारी मिळण्याची आशा धूसर झाल्याने अनेक उमेदवारांनी काढला मैदानातून पळ !

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटामध्ये तिकिटासाठी रस्सीखेच सुरु असली तरीही केज विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी ही निष्ठावंत असलेल्या माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनाच निश्चित मिळणार आहे ही काळ्या दगडावरची पांढरी रेषा आहे.त्यामुळे केज मधून पृथ्वीराज साठे हेच उमेदवार निश्चित मानले जात आहेत.परिणामी राष्ट्रवादीतून इतर उमेदवारांना उमेदवारी मिळण्याची आशा आता धूसर होत चालली असल्याने अनेक उमेदवार उमेदवारी जाहीर होण्याच्या आगोदरच मैदानातून पळ काढत असल्याचे चित्र दिसून येत आहे.दरम्यान यापूर्वी शिवसेना आणि भाजपासह इंदिरा काँग्रेसकडून केज विधानसभेची निवडणूक लढवून दोन वेळा पराभूत झालेल्या डॉ. अंजली घाडगे यांनी आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे.





उमेदवारी दिली तर साठे यांचा विजय निश्चित मानला जात आहे. साठे यांच्या बद्दल मतदारसंघात सहानुभूतीची लाट पसरली आहे. त्याचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेसला होऊ शकतो.मात्र डॉ. अंजली घाडगे यांनी केज मधून उमेदवारी ठेवली तरीही त्याचा कोणताही परिणाम किंवा कुठलाही धोका राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांला होणार नाही.कारण डॉ.अंजली घाडगे यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी व केज मतदारसंघातील जनतेसाठी काय योगदान आहे ? हे सर्व मतदारसंघातील जनतेला ठाऊक आहे.

निवडणूक डोळ्यासमोर ठेवून प्रवेश घेतलेल्या अंजली घाडगे यांचे मतदारसंघासाठी काय योगदान आहे ? असा सवाल नागरिकांतून होत आहे.दरम्यान अवघ्या महिन्याभरापूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्या डॉ.अंजली घाडगे यांना जर पक्षाने उमेदवारी नाकारली तर त्यांची भूमिका काय असेल ? तर त्या तरीही त्या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. त्यामुळे सतत पक्ष बदलणाऱ्या डॉ.अंजली घाडगे यांची नेमकी भूमिका काय ? हे सर्व सामान्य जनतेला सर्वश्रुत आहे.जर पक्षाने डॉ. अंजली घाडगे यांना उमेदवारी दिली तर पक्षाला याची मोठी किंमत मोजावी लागू शकते. कारण पुन्हा नमिता मुंदडा शिवाय जनतेला पर्याय नाही. मात्र माजी आमदार साठे यांना विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी सर्वच राजकीय पक्षाचे उंबरठे झिजवले आहेत मात्र अद्याप कुठल्याही पक्षाने हिरवा कंदील दाखवला नसल्याने काही इच्छुक उमेदवार हे सध्या ऑक्सिजनवर आहेत.विधानसभा निवडणूक लढवायची तर किमान वर्षभरापासून तरी मतदारसंघातील जनसामान्याचे प्रश्नासाठी रस्त्यावर उतरायला हवे होते.मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर अनेक उमेदवारांनी अचानकच या नेत्याची भेट घे त्या नेत्याची भेट, उमेदवारीची मागणी केली आहे.आता तर कहर म्हणजे काही उमेदवारांनी कुठेच नाही जमले तर मग जरांगे पाटलांच्या भेटीला जाऊन त्यांची तरी उमेदवारी मिळेल अशी अशा धरली होती मात्र तिथे देखील निराशाच पदरी पडत असल्याचे दिसून आले आहे.त्यामुळे आता मतदारसंघात दौरे काढून जनतेच्या भेटी गाठी घेऊन त्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर करून उमेदवारी मिळणार का ? असा सवाल सर्व सामान्य मतदारांतून केला जात आहे. निष्ठावंताला डावलून उमेदवारी दिल्यास राष्ट्रवादीला महागात पडेल.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळण्याची आशा धुसर झाल्याने अनेक इच्छुक उमेदवारांनी आताच मैदान सोडून पळ काढल्याचे चित्र दिसत आहे.दरम्यान केज मध्ये भाजपाकडून विद्यमान आ.नमिता मुंदडा यांचीच उमेदवारी निश्चित मानली जात आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून माजी आ.पृथ्वीराज साठे यांचीच उमेदवारी निश्चित मानली जात आहे.केज विधानसभा मतदार संघातील लढती जवळपास निश्चित झाल्या आहेत प्रामुख्याने भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात निवडणुक होणार हे निश्चित झाले आहे.भाजपाकडून विद्यमान आ.नमिताताई मुंदडा यांची उमेदवारी अंतिम असून येत्या काही दिवसात मुंदडा यांची उमेदवारी निश्चित होऊन अधिकृत त्यांच्या नावाची घोषणा होईलच कारण भाजपाकडून मुंदडा शिवाय कोणीच उमेदवारी अद्याप पर्यंत मागीतलेली नाही.त्यामुळे त्यांची उमेदवारी ही काळ्या दगडावरील पांढरी रेषा आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाकडून डझनभर उमेदवारांनी मुलाखती देऊन उमेदवारी देण्याची मागणी केलेली असली तरीही निष्ठावंत असलेले प्रामुख्याने माजी आ.पृथ्वीराज साठे हेच या उमेदवारीचे प्रमुख दावेदार व हक्कदार आहेत.त्यामुळे ऐनवेळी पक्षाकडून आयात केलेल्या उमेदवारांना उमेदवारी दिली जाणार नाही याची पुरेपूर काळजी पक्ष श्रेष्ठीकडून घेतली जात असल्याचे समजते. जर निष्ठावंत साठे यांना डावलून पक्षाने महिन्याभरापूर्वीच पक्षात दाखल झालेल्या डॉ.सौ.अंजलीताई घाडगे यांना उमेदवारी दिली तर पक्षाला यांचे गंभीर परिणाम भोगावे लागतील हे वास्तव देखील नाकारता येणार नाही. असो येत्या काही दिवसात चित्र स्पष्ट होईलच परंतु केज मध्ये अनेक इच्छुकांनी केज विधानसभा मतदार संघ हा प्रतिष्ठेचा केला आहे. हेही तितकेच खरे !

तात्या गवळी, केज तालुका प्रतिनिधी, दैनिक महावृत्त
मो.+९१८८५७९२४२९२

# चिखल दीक्षाभूमीवरील आणि.!

सम्राट अशोक विजयादशमी दिनी नागपूर येथील दीक्षाभूमीला लक्षावधी बौद्धांची गर्दी ही आता नियमित बाब झाली आहे.एवढ्या मोठ्या गर्दीचे नियंत्रण करणे ही बाब जुन्या काळी तशी कठीणच होती. तथापि,काही सार्वजनिक कारणांसाठी कोणताही मानवी समूह एकत्र येतो तेव्हा त्याप्रीत्यर्थ काही उपाययोजना करणे हे आता आधुनिक शासन - प्रशासन व्यवस्थेचे एक महत्त्वपूर्ण अंग झाले आहे. कुंभमेळ,आषाढी एकादशी वा तत्सम निमित्ताने होणाऱ्या गर्दीचे नियोजन करण्याचा आपल्या शासन - प्रशासन व्यवस्थेला दांडगा अनुभव देखील आहे.त्यामुळे सम्राट अशोक विजयादशमीच्या निमित्ताने दीक्षाभूमीवर येणाऱ्या गर्दीचे नियोजन करणे ही आताच्या काळात शासन प्रशासनाच्या दृष्टीने तशी सामान्य बाब आहे. विशेषतः नागपूर शहराचे अनुक्रमे दिल्ली व मुंबईत प्रतिनिधित्त्व करणारे नितीन गडकरी व देवेंद्र फडणवीस हे ‘हेवी वेट पॉलिटिशियन’ मोक्याच्या जागी असल्यामुळे तर या गर्दीचे व्यवस्थापन अगदी आदर्शवत व्हायला हवे,अशी अपेक्षा वावगी म्हणता येणार नाही.जोडीला जागृत आंबेडकरी जनतेचा रेटा असल्याने तर हा आदर्शवाद वास्तवात उतरण्यास काहीच अडचण नव्हती. परंतु सम्राट अशोक विजयादशमी निमित्त दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या लक्षावधी जनतेला गडकरी - फडणवीसांची कार्यक्षमता दिसली नाही,ही वस्तुस्थिती आहे. विशेषतः येत्या काही महिन्यांत महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक होणार असल्याने निदान राजकीय कारणांसाठी का असेना परंतु गडकरी - फडणवीस द्वयींनी या गर्दीकडे दुर्लक्ष करायला नको होते. नुकत्याच होऊन गेलेल्या हरियाणा निवडणुकीत आंबेडकरी समाजाची मते किती महत्त्वाची असतात,हे काँग्रेस व भाजपा या दोघांनीही अनुभवले आहे.तरीही लाखोंच्या संख्येने दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या लक्षावधी आंबेडकरी अनुयायांच्या सोईसुविधांकडे ना गडकरी- फडणवीसांचे लक्ष आहे,ना राहुल गांधी - शरद पवारांचे व ना सत्तांतर करण्यास उतावळ्या झालेल्या उद्धव ठाकरेंचे ! महाराष्ट्रातील जागृत आंबेडकरी जनतेच्या सहकार्याशिवाय या सर्व महारथींचे सार्वजनिक जीवन कसे पूर्णत्त्वास जाईल, हे त्यांचे त्यांनाच ठाऊक !

हे नमूद करण्याचे कारण असे कि,येथे येणाऱ्या लक्षावधी आंबेडकरी अनुयायांना मूलभूत नागरी सोईसुविधा उपलब्ध करणेबाबत शासन - प्रशासनासह उपरोक्त सर्व महनीय व्यक्तीमत्त्वांनी पुरेशी काळजी घेतलेली नाही,असे दिसून आले आहे. अशा गर्दीचे व्यवस्थापन करताना दळणवळण,अन्नपाणी,निवारा,मलमूत्र विसर्जन या मूलभूत सोईसुविधा उपलब्ध कराव्या लागतात. दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या लक्षावधी आंबेडकरी जनतेला अशा पुरेशा नागरी सोईसुविधा उपलब्ध करायला हव्यात,याचा विचार कोणालाही करावासा का वाटत नाही ?

मुळात काही महिन्यांपूर्वी सुशोभिकरणाच्या नावाखाली दीक्षाभूमीवर मोठे मोठे खड्डे खणून ठेवल्यामुळे स्थानिक जनतेत प्रचंड रोष आहे. या सुशोभिकरणाचे कंत्राट २००/- कोटी रुपयांचे असल्यामुळे त्यांत स्थान न मिळालेल्या मंडळींनी जनतेच्या असंतोषाला व्यवस्थित खतपाणी घालून हे काम थांबवले,असे सांगितले जाते.त्यामुळे यावर्षी दसऱ्याला येणाऱ्या जनतेला सोईसुविधा देण्याऐवजी आमचे किती नुकसान झाले ? याचा हिशोब करण्यात सगळी मंडळी गुंतली असल्याचे देखील सांगितले जाते. दोनशे कोटी रुपये हा तसा मोठा आकडा आहे. या एवढ्या मोठ्या हिशोबाच्या तुलनेत दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या लक्षावधी अनुयायांच्या नागरी सोईसुविधा म्हणजे किस झाड की पत्ती,असा संबंधित मंडळींचा गैरसमज झाला असावा,असे एकूण चित्र दिसते.

उदाहरणादाखल,दीक्षाभूमीवर टाकण्यात आलेल्या ग्रंथ विक्रेता स्टॉलच्या व्यवस्थेकडे अंगुलीनिर्देश करण्यात येईल. ग्रंथ विक्रेत्यांची वेगळी व्यवस्था करणे ही बाब तशी कौतुकास्पद म्हणायला हवी. ग्रंथ प्रकाशक - विक्रेते हा संवेदनशील बुद्धिवादी वर्ग समजला जातो. नियमित जनसंपर्कामुळे या विचारी वर्गाला जनतेच्या नाडी बरोबर समजते. आश्चर्य म्हणजे या ग्रंथ प्रकाशक - विक्रेत्यांना साधे पिण्याचे पाणी देखील उपलब्ध करण्यात आले नाही. या ग्रंथांच्या स्टॉलवर भेट देणाऱ्या वाचकांना तर अक्षरक्षः चिखल तुडवीत ग्रंथ विकत घ्यावे लागत होते. ऐन वेळेस आलेल्या पावसाला कोणी थांबवू शकत नाही,हे खरेच आहे.परंतु या पावसामुळे येणाऱ्या लक्षावधी जनतेपुढे काय अडचणी उभ्या राहू शकतात व त्यांचे निराकरण कसे करावे,यांसाठी सरकारी नोकरशाही,लोकप्रतिनिधी,मंत्री अशी



महनीय पदे सजविणाऱ्या मंडळींनी विचारविनिमय करुन उपाययोजना करणे अपेक्षित असते. यालाच जबाबदार व संवेदनशील यंत्रणा म्हटले जाते. दसऱ्याच्या सुमारास नागपूर परिसरात पाऊस पडू शकतो,असा अंदाज देखील हवामान खात्याने व्यक्त केला होता. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय करण्यास सरकारी यंत्रणांकडे पुरेसा अवधी होता.तथापि,आधीच नमूद केल्याप्रमाणे आपल्याकडील महनीय व्यक्तीमत्त्वे दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या अनुयायांकडे उपेक्षित नजरेने पाहात आहे. या जनतेत असणारे आबालवृद्ध,महिला, विशेषतः गरोदर महिला यांना या चिखलाच्या रस्त्यांत किती हालअपेष्टा भोगाव्या लागल्या असतील ? लक्षावधीच्या संख्येने दीक्षाभूमीवर येणारी आंबेडकरी समाजाची ही गर्दी चिखलात पाय घसरुन पडली काय किंवा ती चिखलाने बरबटून गेली काय, कोणालाही त्यांची फिकीर असल्याचे आढळून आले नाही.

बुद्धिवादी म्हणवल्या जाणाऱ्या वर्गाची अशी दुरावस्था असेल तर सर्वसामान्य जनतेला काय भोगावे लागत असेल,याची आपण कल्पना करु शकतो.या प्रकरणी दीक्षाभूमी स्मारक समिती नावाची स्वतःला अधिकृत म्हणवून घेणारी संस्था काय करीत आहे,असा प्रश्न देखील उद्भवतो. दीक्षाभूमीवर येणाऱ्या जनतेला नागरी सोईसुविधा पुरविण्याची जबाबदारी दीक्षाभूमी स्मारक समितीची नाही,हे खरे आहे. परंतु यांसाठी विविध सरकारी यंत्रणांचा समन्वय करुन एकविसाव्या शतकातील गर्दी व्यवस्थापनाचा नमुना दीक्षाभूमी स्मारक समितीने दाखवावा,अशी अपेक्षा वास्तववादीच म्हणायला हवी. ही समिती एका स्टॉलमागे सात हजार रुपये एवढे भाडे आकारते. यांत टेबल - खुर्च्या यांचे भाडे समाविष्ट नाही ! ग्रंथ लेखक - प्रकाशक- विक्रेते हे एक प्रकारे ज्ञान संवर्धनाचे सत्कार्य करीत असतात. दीक्षाभूमीवर येणारे ग्रंथ प्रकाशक - लेखक हे तर आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्याचा प्रचार प्रसार करण्याचे कुशल कर्म करीत असतात. परंतु एवढे भाडे घेऊनही या ग्रंथ विक्रेत्यांना नियमित व तात्कालिक सोई-सुविधा उपलब्ध झाल्या नाहीत,हे एक कटू सत्य आहे.

वस्तुतः या समितीवर विविध आरोप - प्रत्यारोप होत आहेत.तिचे नियंत्रण रास्व संघ या मनुवादी संघटनेकडे आहे,असेही काही जण म्हणतात.खरे खोटे एक तर दीक्षाभूमी स्मारक समितीला माहित किंवा रास्व संघाला ! तथापि,दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या आंबेडकरी जनतेकडे दुर्लक्ष करुन दीक्षाभूमी स्मारक समिती बेजबाबदारपणे वागत आहे,एवढे मात्र खरे ! दसऱ्याच्या निमित्ताने मागील कित्येक वर्षांपासून दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या एका कार्यकर्त्याने या स्मारक समितीबाबत बोलकी प्रतिक्रिया व्यक्त केली. या वर्षी दीक्षाभूमी परिसरात झालेला चिखल अधिक आहे कि,दीक्षाभूमी स्मारक समितीच्या सदस्यांच्या डोक्यातील चिखल अधिक आहे ; याचा फैसला केल्यास दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य जिंकतील असे मत या कार्यकर्त्याने व्यक्त केले.

दसऱ्याच्या निमित्ताने आंबेडकरी जनता जगभरातून दीक्षाभूमीला येते. या जनतेने येथील चिखलाचा हा दाखला जगभर सांगून येथील लोकप्रतिनिधी व दीक्षाभूमी स्मारक समितीच्या प्रतिमेला चिखल फासावा,अशी कोणाची इच्छा असल्यास ती लवकरच फलद्रुप होईल,अशी चिन्हे दिसत आहेत. या वर्षी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांत या गोष्टीकडे आंबेडकरी जनतेने देखील आवर्जून लक्ष द्यायला हवे,एवढे मात्र खरे !

*******

शुद्धोधन अहेर
९८२०१७२२९८ मुंबई.

# भरधाव टेम्पोने वृद्ध शेतकरी दाम्पत्यास उडविले किनवट तालुक्यात भीषण अपघात : कारवाईसाठी संतप्त जमावाने केला रास्ता रोको

**इस्लापूर : किनवट तालुक्यातील**
इस्लापूर पोलिस ठाणे हद्दीत शेताकडे जाणाऱ्या वृद्ध जोडप्याला भरधाव टेम्पो उडविल्याची घटना घडली असून यात शेतकरी दाम्पत्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर घटनास्थळी पोलीस वेळेवर दाखल न झाल्याने तसेच आरोपीवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी संतप्त जमावाने रास्ता रोको केला. घटनेनंतर चालक जागेवर न थांबता फरार झाला आहे.

किनवट/शेख शौकत :–किनवट ते नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील सावरगाव येथे एक वृद्ध जोडपे आपल्या शेताकडे पायी जात होते. बुधवारी (दि.१६) सकाळी ११ वाजेच्या सुमारास या जोडप्याला भरधाव वेगात आलेल्या टेम्पोने जोरदार धडक दिली. या घटनेत नागोराव संभाजी कुरुडे (६५) व नीलाबाई नागोराव कुरुडे (६०) यांचा जागीच मृत्यू झाला. हे दोघेही सावरगावचेच रहिवासी असल्याचे सांगण्यात आले. या घटनेची माहिती सावरगाव येथील शेषराव पाटील, माधवराव डोखळे, प्रेम जाधव यांनी इस्लापूर पोलिसांना दिली. तोपर्यंत संतप्त जमावाने किनवट नांदेड राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला. मृतदेहासह दोन तास रास्ता रोको करण्यात आल्याने वाहतूक कोंडी झाली होती.

अपघातातील मृत नागोराव कुरुडे व नीलाबाई कुरुडे, घटनेनंतर रास्ता रोकोमुळे दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

**आरोपीला त्वरित अटक करण्याची मागणी**

मयताचे नातेवाईक व नागरिकांनी केली अपघाताची माहिती वेळेवर देऊनही पोलिस वेळेवर न आल्याने जमावाने रोष व्यक्त केला. जोपर्यंत आरोपीला पकडणार नाहीत तोपर्यंत मृतदेह उचलणार नाही अशी भूमिका जमावाने घेतली. दोन तासानंतर पोलिसांनी नागरिकांची समजूत काढली. त्यानंतर मृतांच्या नातेवाईकांनीच समजूतदारपणा दाखवत आरोपीला लवकरात लवकर अटक करावी अशी मागणी इस्लापूर पोलिसांकडे केली. इस्लापूरचे सहाय्यक पोलिस निरीक्षक उमेश भोसले यांनी आरोपीला तात्काळ अटक करू असे आश्वासन दिल्यावर जमावाने नरमाईची भूमिका घेत मृतदेह पोलिसांकरवी जलधारा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी नेला.





या प्रकरणी सायंकाळी उशिरापर्यंत कुणाविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. या घटनेनंतर काही वेळाने स्थानिक नागरिक तसेच लोकप्रतिनिधी, राजकीय पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधून जमावाचा रोष कसा आहे हे सांगितले.

# पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीत घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेकडून २४ तासात अटक.

लातूर :– पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीत घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेकडून २४ तासात अटक.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की काल दिनांक १७/१०/२०२४ रोजी सकाळी शिवाजी देवकर नावाच्या इसमाचा लोखंडी कत्तीने मारहाण करून खून केल्याची घटना घडली होती.

मयताच्या नातेवाईकाने दिलेल्या फिर्याद वरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे काही व्यक्ती विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात गुन्ह्यातील फरार आरोपीचा शोध घेण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पथक तयार करून रवाना करण्यात आले होते.




सदरचे पथक गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध होते. दरम्यान पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून गुन्ह्यातील फरार आरोपी नामे अजय सुनील मुद्दे, वय २५, वर्ष राहणार बाबा नगर, दगडी कमान, खाडगाव रोड, लातूर, कृष्णा सुनील मुद्दे,राहणार बाबा नगर, दगडी कमान, खाडगाव रोड, लातूर. व सोबत त्याची आई अशा तिघांना आज सकाळी धाराशिव शहरातील वडार गल्ली, शिवाजी चौकातून गुन्ह्यात वापरलेल्या ईरटीका कारसह ताब्यात घेण्यात आले असून नमूद अशा तिघा आरोपींनीं मिळून मागील काळातील घरगुती भांडणाच्या कारणावरून शिवाजी देवकर याचा लोखंडी कत्तीने मानेवर छातीवर मारून खून केल्याचे कबूल केले.

त्यावरून नमूद आरोपींना ताब्यात घेऊन पुढील तपास कामी पोलीस ठाणे शिवाजीनगर यांची ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वातील पथकामधील पोलीस अंमलदार युवराज गिरी, राहुल सोनकांबळे, अर्जुन राजपूत, पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलिस अमलदार काकासाहेब बोचरे, महिला पोलीस अंमलदार साधना सूर्यवंशी यांनी केली आहे.

# वंचित'च्या दुसऱ्या यादीत नांदेड जिल्ह्यातून प्रा. गौतम दुधडे, प्रा. विजय खुपसे व सुशीलकुमार देगलूरकर यांना संधी

किनवट/शेख शौकत :–राज्यात वंचित बहुजन आघाडीने विधानसभा धानमभा निवडणुकीसाठी राज्यातील अन्य ३० उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. या यादीमध्ये नांदेड जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांचाही समावेश आहे. नुकत्याच जाहीर केलेल्या उमेदवारांमध्ये नांदेड उत्तरमधून प्रा. गौतम दुथडे तर किनवटमधून प्रा. विजय खुपसे व देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघातून सुशीलकुमार देगलूरकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.







वंचित बहुजन आघाडीचे नेते अँड बाळासाहेब आंबेडकर यांनी राज्यातील ३० विधानसभा मतदारसंघात उमेदवार घोषित केले. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील किनवट विधानसभा मतदारसंघातून प्रा. विजय खुपसे, नांदेड उत्तरम धून प्रा. डॉ. गौतम दुथडे आणि देगलूर विधानसभा मतदार संघातून सुशीलकमार देगलूरकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यापूर्वीच्या यादीत नांदेड जिल्ह्यातील लोहा–कंधारमधून शिवा नरंगले तर नांदेड दक्षिणमधून फारूक अहेमद यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. या घोषणेनंतर जिल्ह्यातील नऊ मतदारसंघापैकी पाच मतदारसंघात वंचितचे उमेदवार आता निश्चित झाले आहेत. उमेदवारांची घोषणा करण्यात वंचित बहुजन आघाडीने आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. दरम्यान वंचितने जाहीर केलेल्या उमेदवारांमुळे सोशल मिडियाच्या माध्यमातून दावे करणाऱ्या काही इच्छुकांची मात्र हवा गुल झाली आहे.

# माणसाला माणूस बनवण्याचा करेक्ट कार्यक्रम म्हणजे वर्षावास – भदंत शांतिरत्न

भाईंदर / प्रतिनिधी :– जगाला बुद्ध धम्माशिवाय पर्याय नाही. त्यामुळे समाजाला धम्म समजून घेण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवावे लागतील. धम्म परिषदा घ्याव्या लागतील. त्यातून चांगल्या प्रथा चालू ठेवणे व चुकीच्या प्रथा बंद कराव्या लागतील. वर्षावास काळात आपण बुद्ध आणि त्यांचा धम्म समजून घेण्याचा प्रयत्न करतो. माणसाला माणूस बनवण्याचा करेक्ट कार्यक्रम म्हणजे वर्षावास आहे, असे स्पष्ट प्रतिपादन पूज्य भदंत शांतीरत्न यांनी केले. धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार व्यवस्थापन समिती व वंदना ग्रुप यांच्या वतीने आयोजित आश्विन पौर्णिमा तथा वर्षावास समाप्ती कार्यक्रमात ते बोलत होते.





सुरुवातीला रामदेव पार्क येथील धम्म सम्राट अशोक बुद्ध विहाराला परिक्रमा घालून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. भदंत कीर्तिपियो नागसेन यांनी उपस्थितांना त्रिशरण पंचशील दिले. दरम्यान तीन महिन्याचा वर्षावास काल यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केलेल्या धम्मसेवकांचा भदंत कीर्तिपियो नागसेन यांच्या हस्ते पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. उत्तम भगत यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार व्यवस्थापन समिती पदाधिकारी व वंदना ग्रुपच्या सर्व धम्म सेवकांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाला मिरा भाईंदर मधील धम्म बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## झारखंडमध्ये भाजप ठरला मोठा भाऊ!

रांची : वृत्तसंस्था झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी एनडीएचं जागावाटप निश्चित झालं आहे. या निवडणुकीत आजसू १० जागांवर तर जेडीयू २, चिराग पासवान यांच्या एलजेपीला १ आणि उर्वरित ६८ जागांवर भाजप निवडणूक लढविणार आहे. केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे निवडणूक प्रभारी शिवराज सहिं चौहान यांनी याबाबत घोषणा केली. झारखंडमध्ये भाजपच्या नेतृत्वात एनडीएकडून ऑल झारखंड स्टूडेंट्स यूनियन, जनता दल(यू) आणि लोकजनशक्ती पार्टी मिळून निवडणुकीला सामोरे जाणार आहे. या ठिकाणी जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला असून लवकरच उमेदवारांची घोषणा केली जाणार आहे.

# बारामतीत पवार विरुद्ध पवार लढत अटळ?

बारामती : देश आणि राज्याच्या राजकाणात महत्वाची भुमिका बजाविणा–या ज्येष्ठ नेते शरद पवार यांची कर्मभुमी म्हणुन बारामतीची देशात ओळख आहे. मात्र,महाविकास आघाडीतून बाहेर पडत उपमुख्यमंत्री अजित पवार सत्तेत सहभागी झाल्यानंतर बारामतीची राजकीय गणिते कमालीची बदलली आहेत. लोकसभा निवडणुकीतच बारामतीकरांना याची प्रचिती आली. लोकसभेत नणंद भावजयीचा सामना झाल्यानंतर विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे सख्खे पुतणे युगेंद्र पवार यांच्यात लढत होण्याची गडद शक्यता आहे.खासदार सुप्रिया सुळे यांचा चांगल्या मताधिक्क्याने लोकसभेत विजय झाला. या विजयानंतर शरद पवार गटाचा 'कॉन्फीडन्स' वाढला आहे. मात्र, तुलनेने युगेंद्र पवार नवखे आहेत. शिवाय बारामती शहर आणि तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्थांवर उपमुख्यमंत्री पवार यांची मजबूत पकड आहे. त्यामुळे यूगेंद्र पवार यांना उपमुख्यमंत्री पवार यांच्या आव्हानाला त्यांना सामोरे जावे लागणार आहे.लोकसभेचा गड राखण्यात महत्वाची रणनीती आखणा–या थोरल्या पवारांची विधानसभा रणनीती देखील या निवडणुकीत महत्वाची ठरणार आहे. सध्या ज्येष्ठ नेते शरद पवार राज्यातील रणनीती, पक्षप्रवेश यामध्ये व्यस्त आहेत. अद्याप त्यांनी बारामतीची उमेदवारी जाहीर केलेली नाही. मात्र, लवकरच बारामतीची उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यानंतर ज्येष्ठ नेते पवार बारामतीच्या कर्मभुमीत लक्ष घालण्याची शक्यता आहे. तर खासदार सुप्रिया सुळे यांनी मात्र युगेंद्र पवार यांना विधानसभेसाठी पाठबळ देण्यास सुरवात केली आहे. बारामतीत आजही पवार कुटुंबातील निर्माण झालेली दरी सर्वसामान्य बारामतीकरांना आवडलेली नाही. मात्र, दोघांपैकी एकाची निवड अटळ असल्याने बारामतीकर हतबल आहेत. बारामती विधानसभा मतदारसंघात दोन्ही पवारांना मानणारा मोठा मतदार आहे. सन २००९ पासून लोकसभेला 'ताई' आणि विधानसभेला 'दादा' असे सुत्र बारामतीकरांनी नेहमीच व्यक्त केले आहे. लोकसभा निवडणुकीत पत्नी सुनेत्रा पवार यांचा लोकसभेचा पराभव अजित पवारांच्या जिव्हारी लागला आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी पक्ष पदाधिका–यांचे राजीनामे घेत बुथ कमिटीची नव्याने पुनर्रचना केली. सुरवातीला उपमुख्यमंत्री पवार यांनी विविध वक्तव्यांमधुन जाहीर सभांमधून स्वतःच्या उमेदवारीबद्दल संभ्रम निर्माण केला. मात्र, कार्यकर्ते हट्टाला पेटल्याने अखेर अजित पवार यांची बारामतीतून उमेदवारी राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांनी यापुर्वीच जाहीर केली. उपमुख्यमंत्री पवार यांच्या जनसन्मान यात्रेला युगेंद्र पवार यांनी स्वाभिमानी यात्रा काढत बारामती मतदारसंघ पिंजुन काढला आहे.



# सुमेध बप्पा शिंदे विचार मंचच्या लोगोच्या स्टिकरचे अनावरण हारुणभाई इनामदार व सीताताई बनसोड यांच्या हस्ते संपन्न

केज/प्रतिनिधी :– सुमेध बप्पा शिंदे विचार मंचच्या लोगोच्या स्टिकरचे अनावरण जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते संपन्न झाले आहे. केज शहरांमध्ये सुमेध बप्पा शिंदे विचार मंचाची स्थापना करण्यात आली आहे त्या अनुषंगाने विचार मंचच्या लोगोच्या स्टिकरचे अनावरण जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार व केज नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सुमेध बप्पा शिंदे विचार मंचाच्या फलकास पुष्पहार अर्पण करून विचार मंचच्या लोगोचे स्टिकर हे ३५ ते ४० मोटर सायकलला लावण्यात आले त्याचबरोबर काही शहरातील रिक्षांना देखील लावण्यात आले आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सुमेध बप्पा शिंदे विचार मंचाचे उपाध्यक्ष प्रेम मस्के म्हणाले की, या विचार मंचाच्या माध्यमातून केज शहरासह तालुक्यातील विद्यार्थी,युवक,युती महिला, नागरिक यांच्या विविध प्रश्नावर काम करणार आहेत. पुढे बोलताना प्रेम मस्के यांनी सांगितले की, सुमेध बप्पा शिंदे यांच्या नावाने विचार मंच स्थापन करण्यामागचा उद्देश एवढाच आहे तो म्हणजे त्यांनी जनसेवेचा घेतलेला वसा हा आम्ही अर्ध्यावर सोडणार नाहीत. सुमेध बप्पा शिंदे यांनी जो मार्ग आम्हाला दाखवून दिला आहे त्या मार्गाने आम्ही चालणार आहोत त्यांचे विचार सदैव आम्ही अमर ठेवणार आहोत असे बोलताना मस्के यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार,नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, युवा नेते लखन भैय्या हजारे, अमोल आप्पा मिसाळ, किरण जोगदंड, विवेक बनसोड, राहुल इनकर, पियुष काळे,पियुष,जानवे, आदित्य हजारे, रेवन आप्पा, संदेश ताकतोडे यांच्यासह सुमेध बप्पा शिंदे विचार मंचाचे पदाधिकारी उपस्थित होते.






PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE